# व्यसनाधीन समाज भांडवलदारांचा गुलाम

## विजय नवले : व्यसनमुक्ती अभियानास सुरुवात

पुणे : कष्टकरी, गरीब झोपडपट्टीमध्ये राहणारा समाज आजही व्यसनांमुळे भांडवलदार, प्रस्थापित राजकारण्यांचा गुलाम बनला आहे, असे मत प्रा. विजय नवले यांनी व्यक्त केले.

अरुणदादा बेल्हेकर युवा राष्ट्रनिर्माण संस्थेच्या व्यसनमुक्ती अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभियानाला सुरुवात झाली. संस्थेचे अध्यक्ष शैलेंद्र बेल्हेकर, विठ्ठल सातव, साधना पराडकर, उषा राऊत, जयश्री तांबोळे, विद्याधर भोसले, प्रशांत सुरसे, उज्ज्वला टिळेकर उपस्थित होते. प्रा. नवले म्हणाले, की समाज जर व्यसनमुक्त झाला, तर राष्ट्र आरोग्यसंपन्न व शोषणमुक्त होईल. व्यसनांमुळे स्त्रियांवर होणारे अत्याचार कमी होतील. गुन्हेगारीकडे जाणारा तरुणवर्ग वाढला आहे, या प्रवृत्तीला कायमचा आळा घालण्यासाठी व्यसनमुक्ती हा एकमेव व चांगला पर्याय आहे, त्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

संस्थेच्यावतीने सुमारे पाच हजार लोकांना व्यसनमुक्तीविषयी पत्रके वाटण्यात आली. (वार्ताहर)